**<u>दिनांक ०३.१२.२०१६ रोजी मा. मुख्य माहिती आयुक्त यांचे समवेत सर्व खंडपीठातील माहिती आयुक्त यांची राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दालनात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.</u>**

**<u>खालील आयुक्त उपस्थित होते</u> -**

**१. श्री. रत्नाकर गायकवाड, मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त**
**२. श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**
**३. श्रीमती टी. एफ. थेक्केकरा, राज्य माहिती आयुक्त, कोंकण**
**४. श्री. रविंद्र जाधव, राज्य माहिती आयुक्त, पुणे**

**मुद्दा क्र. १. दिनांक ०१.०८.२०१५ रोजी झालेल्या आयोगाच्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूर करणे.**

मागील दिनांक ०१.०८.२०१५ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्तावर सविस्तर चर्चा करुन ते मंजूर करण्यात आले.

**मुद्दा क्र. २. प्रलंबित द्वितीय अपिले व तक्रारींचा आढावा.**

मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी माहिती आयुक्तांबरोबर चर्चा करुन प्रलंबित द्वितीय अपीले तसेच तक्रारींचा आढावा घेतला. मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी बृहन्मुंबई व नागपूर या खंडपीठांची प्रलंबित द्वितीय अपीले कमी प्रमाणात असल्याने समाधान व्यक्त केले. तसेच अमरावती खंडपीठाने माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये एकूण १०५० द्वितीय अपीले निकाली काढली, याबाबत मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त, अमरावती यांचे अभिनंदन केले. तसेच सर्व खंडपीठांनी प्रलंबित प्रकरणाची जी आवक आहे त्यापेक्षा जास्त प्रकरणे निकाली काढावी जेणेकरुन प्रलंबित द्वितीय अपीलांची संख्या कमी होईल असे सूचित केले.

**मुद्दा क्र. ३. विविध खंडपीठात रिक्त पदांचा आढावा.**

विविध खंडपीठात रिक्त असलेली पदे कंत्राटी पद्धतीने तात्काळ भरण्याबाबत सर्व आयुक्तांना मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सूचित केले. श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी सर्व खंडपीठामध्ये विधी अधिकारी असणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यावर मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सदरबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत सचिव यांना सूचना दिल्या.

**मुद्दा क्र. ४. व्हिडीओ कॉन्फरन्सींग सुविधा.**

उपस्थित सर्व राज्य माहिती आयुक्तांनी त्यांच्याकडे व्हिडीओ कॉन्फरन्सींग सुविधा चालू असल्याचे सांगितले.

**मुद्दा क्र. ५. विविध बाबींसाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदी.**

सर्व खंडपीठासाठी आवश्यक त्या अंदाजपत्रकीय तरतूदी करण्यात येतील याबाबत सचिवांनी खात्री करावी अशा सूचना मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

**मुद्दा क्र. ६. पेपरलेस ऑफिस.**

पेपरलेस ऑफिस संदर्भात श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये केलेल्या कामाची माहिती दिली. याबाबत मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सदर कामांची प्रशंसा केली. तसेच सर्व खंडपीठांच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन याबाबत माहिती देण्याबाबत मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी श्री. ए. के. जैन, राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांना सूचित केले.

**मुद्दा क्र. ७. सिक्स बंडल सिस्टीम.**

सर्व खंडपीठांना आपल्या कार्यालयामध्ये सिक्स बंडल सिस्टीम चालू करण्याच्या सूचना मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सर्व आयुक्तांना दिल्या.

**मुद्दा क्र. ८. अतिरिक्त खंडपीठे स्थापन करण्याबाबत.**

मुख्यालय, पुणे व औरंगाबाद येथे प्रत्येकी एक अतिरिक्त खंडपीठ स्थापन करण्याबाबत शासनास शिफारस करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

वरील मुद्यांवर सर्व चर्चा झाल्यानंतर मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून बैठक समाप्त केली.